सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## विधि व न्याय विभाग

## (सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २)

## यात्रेकरू संरक्षण अधिनियम, १८८७

(२७ ऑक्टोबर २०१५ पर्यंत सुधारित)

## (Bombay Act No. II of 1887)

# The Protection of Pilgrims Act, 1987

*(As Modified up to the 29th October 2015)*

व्यवस्थापक, मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, नागपूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

**२०१५**

**[किंमत** : रुपये ]

# (सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २)

## यात्रेकरू संरक्षण अधिनियम, १८८७

### अनुक्रमणिका


**उद्देशिका.**

**कलमे**

१. लघु संज्ञा, व्याप्ति.

२. व्याख्या :—

"यात्रेकरु"

"यात्रत्त दलाल"

"अभिकर्ता"

"कमिशनर"

३. लैसेन्साशिवाय यात्रादलालाचें काम केल्याबद्दल दंड.

४. यात्रा दलाल म्हणून काम करण्यासाठीं इसमांना लैसेन्स देणे.

५. लैसेन्सामध्ये निर्दिष्ट करावयाच्या गोष्टी.

६. परवाना दिलेल्या यात्रा दलालाच्या गैरवर्तणुकीबद्दल दंड.

७. लैसेन्स तहकूब व रद्द करण्याचा अधिकार.

[कलम ८ ते १२ व (निरसित)].

१३. अधिक संख्येत तिकिटें दिल्याबद्दल दंड.

१४. प्रवास तिकिटांवर क्रमांक कसे द्यावयाचे ते, तोच क्रमांक असलेली तिकिटे दिल्याबद्दल दंड.

१५ यात्रेकरू जहाज अधिनियम, १८८५ चे उपबंध हे गुन्ह्यास व दंडास लागू असणे.

१६. कमिशनरच्या सूचनेवरून शिक्षा अंमलात आणणे.

# सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २[१]

# यात्रेकरू संरक्षण अधिनियम, १८८७

[दिनांक ४ जून १८८७]

हा अधिनियम सन १९२७ चा मुंबई अधिनियम, १४ व सन १९३२ चा मुंबई अधिनियम, २० यांअन्वये अशंतः रद्द करण्यात आला व त्यांत पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :–

सन १९९५ चा मुंबई अधिनियम, ५.

भारतीय विधि अनुकूलन परिषद् आदेश.

विधि अनुकूल आदेश, १९५०.

**मुंबई व कराची बंदरांतील यात्रेकरुंच्या संरक्षणासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम**

**ज्याअर्थी,** मुंबई व कराची बंदरांतील यात्रेकरूच्या संरक्षणासाठी तरतूद करणें इष्ट आहे; **त्याअर्थी** याअन्वये पुढील प्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :–

लघु संज्ञा, व्याप्ति.

**१.** (१) ह्या अधिनियमास, यात्रेकरू संरक्षण अधिनियम, १८८७ असे म्हणावे.

तो, [२][मुंबई शहरास व मुंबई बंदरास] लागू आहे.

**२. ह्या अधिनियमांत** :–

व्याख्या "यात्रेकरू."

(१) "यात्रेकरू" या संज्ञेचा अर्थ, [३][***] मुंबई बंदरातून हज्जच्या यात्रेसाठीं जाणारा मुसलमान असा समजावा; मग तो सरळ जद्दाला जाणारा असो किंवा इतर कोणत्याही मार्गाने जाणारा असो.

"यात्रा दलाल."

(२) "यात्रा-दलाल" म्हणजे असा इसम जो यात्रेकरूसाठीं प्रवास तिकिटें विकत घेईल किंवा परत विकील, किंवा प्रतिनिधानांवर विकील किंवा त्याच्या खरेदीसाठी किंवा कोणतेहि बक्षिस घेईल असा इसम समजावा.

"अभिकर्ता."

(३) "अभिकर्ता या संज्ञेत ज्या इसमाने यात्रेकरूच्या वाहतेकींसाठी जलयान भाड्याने घेतले असेल अशा इसमाचा समावेश होतो.

"कमिशनर"

[४][(४) "कमिशनर" या संज्ञेचा अर्थ, मुंबईचा पोलीस कमिशनर किंवा त्याचा दुय्यम अधिकारी असा समजावा.]

लैसेन्सशिवाय यात्रा दलालांचे काम केल्याबद्दल दंड.

**३.** जो कोणी इसम कमिशनकडून लैसेन्स घेतल्याशिवाय यात्रा दलाल म्हणून काम करील तो अशा प्रत्येक अपराधाबद्दल पराकाष्टा पाचशे रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

यात्रा दलाल म्हणून काम करण्यासाठी इसमांना लैसेन्स देणे.

**४.** [५][केन्द्रीय सरकारच्या] आदेशाचे आधीन राहून, कमिशनर यांस, त्यास योग्य वाटतील अशा इसमांना, यात्रा दलाल म्हणून काम करण्यासाठी लैसेन्स देण्याचा अधिकार आहे.

---

१. उद्दिष्ठे व कारणे यांच्या विवरणासाठी, पहा मुंबई शासन राजपत्र, १८८६, भाग ५ पृष्ठ ११ निवड समितीच्या अहवालासाठी, पहा वरील राजपत्राचे पृष्ठ क्र. १७३; आणि परिषदेच्या कामकाजाकरिता पहा वरील राजपत्राचे पृष्ठ क्र. ८९ व वरील अधिनियम १८८७ चे पृष्ठ क्र. १५.

२. विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे "मुंबई व कराची शहरास व मुंबई व कराची बंदरास" या मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील आदेशाद्वारे "किंवा कराची" हा मूळ मजकूर काढण्यात आला.

४. वरील आदेशाद्वारे मूळ खंडाऐवजी खंड (४) दाखल करण्यात आला.

५. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याद्वारे "गव्हर्नर इन कौन्सील" या मूळ मजकुराऐवजी "केन्द्रीय सरकार" हा मजकूर दाखल करण्यात आला.

उक्त लेसेन्सेस, लैसेन्स धारण करणा-यांच्या प्रामाणिक व चांगल्य वर्तणूकीसाईी सरकार वेळोवेळी विहित करील अशा निर्बंधांच्या व मर्यादांच्या आधीन राहून व अशा शर्तीवर मंजूर केले पाहिजेत.

लैसेन्सामध्ये निर्दिष्ट करावयाच्या गोष्टी.

**५.** अशा रीतीने मंजूर केलेल्या प्रत्येक लैसेन्सामध्ये पुढील गोष्टी निर्दिष्ट केल्या पाहिजेत :–

(अ) लैसेन्स धारण करणाराचे नांव व धंद्याच्या जागेचा पत्ता;

(ब) तो अंमलात राहिल ती मुदत;

(क) तो ज्या शर्तीवर व ज्या निर्बंधांच्या व मर्यादांच्या आधीन राहून मंजूर करण्यात आला आहे त्या शर्ती, निर्बंध व मर्यादा;

आणि तो, [१][केन्द्रीय सरकारास] [२][उक्त सरकार] वेळोवेळी निहित करील अशी फी, जर असल्यास दिल्यानंतर मंजूर करण्यात आला पाहिजे.

[३][परंतु, [४][विधी अन्वयें संसदेकडून] एतविरुद्ध तरतूद केली जाणार नाही तोंवर, [५][घटनेच्या] प्रारंभापूर्वी लागलीच, उक्त कलमान्वये वैध रीतीने घेतली जात असलेली सर्व फी ह्या कलमा अन्वये [६][राज्य] सरकारला दिली पाहिजे.]

परवाना दिलेल्या यात्रा दलालाच्या गैरवर्तणुकीबद्दल दंड

**६. जो कोणताहि यात्रा दलाल** :–

परवाना दिलेल्या यात्रा दलालाच्या गैरवर्तणुकीबद्दल दंड

(अ) त्याच्या परवान्याच्या अटी व शर्तीपैकी कोणत्याही अटीचा व शर्तीचा भंग करील;

(ब) ज्या कोणत्याही जलयानास [७][[८]यात्रेकरू नौवहन अधिनियम, १८९५] चे उपबंध लागू आहेत अशा कोणत्याहि जलयानाचे प्रवास तिकिट अशा जलयानाच्या मास्तर, मालक किंवा अभिकर्त्याने असे जलयान ज्या तारखेस प्रवासास निघेल त्या तारखेबद्दल उक्त तारखेबद्दल उक्त अधिनियमाच्या कलम [९][८]अन्वयेंची नोटिस देण्यापूर्वी कोणत्याहि वेळी आणि ज्या कोणत्याहि जलयानाचे बाबतीत जलयान प्रवासास निघण्याची नियोजित तारीख प्रवास तिकिटांवर छापण्यात येते त्या बाबतीत अशी तारीख प्रवास तिकिटांवर छापलेली असल्याखेरीज, कोणत्याही यात्रेकरूसाठी विकत घेईल किंवा त्यास विकेल;

(क) यात्रेकरूवर, त्याचेसाठी खरेदी कलेले काणतेही प्रसास तिकिट खाद्यावस्तू किंवा इतर वस्तु यांच्या वास्तविक, मुल्याहून (कॉस्ट प्राईज) अधिक रक्कम आकारील किंवा अशा तिकिटाबद्दल (यात्रेकरूकडून) त्याचेकडून काणतीही फी किंवा प्रतिनिधान घेईल;

---

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद याद्वारे "केन्द्रीय सरकार" हा मजकूर समाविष्ट केला.

२. वरील आदेशाद्वारे "सरकार" या मूळ मजकुराऐवजी "उक्त सरकार" हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील आदेशाद्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

४. विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे केन्द्रीय विधानमंडळ या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. वरील आदेशाद्वारे "भारत सरकार अधिनियम, १९३५, भाग ३" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. वरील आदेशाद्वारे "प्रांतीय" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. मुंबई यात्रेकरू संरक्षण (सुधारणा) अधिनियम, १९३५ (सन १९१५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५) याच्या कलम २ द्वारे "देशी प्रवासी जहाज अधिनियम, १८७६" या मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८. आता पहा सन १९२३ चा अधिनियम क्रमांक २१.

९. मुंबई यात्रेकरू संरक्षण (सुधारणा) अधिनियम १९१५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५) च्या कलम २ द्वारे "सात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१०. मुंबई यात्रेकरू संरक्षण (सुधारणा) अधिनियम १९१५ (सन १९१५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५) याच्या कलम ६ द्वारे "देशी प्रवासी जहाज, अधिनियम, १८७६ चा क्रमांक १०" या मजकूराऐवजी हा मजकूर व आकडे दाखल करण्यात आले.

(ड) कोणत्याही तिकिटाच्या विक्रीचे बाबतीत, अशा तिकिटाचे किंमतीचे पांच टक्क्याहून अधिक रक्कम कोणताहि फी किंवा प्रतिनिधान म्हणून जलयानाचे मास्तर, मालक किंवा अभिकर्ता यांजकडून घेईल;

अटी व शर्ती यांचा भंग केल्यामुळे करार संपुष्टात आणण्याचा शासनाचा अधिकार.

(इ) ज्या प्रवास तिकिटावर, जलयानाचा मास्तर मालक किंवा अभिकर्तायाने जागेच्या प्रत्यक वर्गासाठी किंमत छापली नाही असे प्रवास तिकिट कोणत्याही यात्रेकरूसाठी विकत घेईल;

(फ) अशा वाहनाचे आकारासंबंधी किंवा त्यावरील जागेसंबंधी लबाडीने किंवा खोटी माहिती देवून किंवा अन्य रीतीने किंवा कोणतेही ढोंग करून एखादे प्रवास तिकिट खरेदी करण्यासंबंधी कोणत्याहि करण्यासंबंधी प्रवृत्त करील;

तो, अशा प्रत्येक अपराधाबद्दल पराकाष्टा रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

एक महिन्याची नोटीस देऊन खरेदीदाराला करार संपुष्टात आणता येईल.

**७.** कमिशनर यांस कोणत्याहि यात्रा दलालाचा लैसेन्स, कोणताहि आरोप सिद्ध झाला असता, तो लगत मागील कलमान्वये ज्या गैरवर्तणूकीमुळे दंडाच्या शिक्षेस पात्र होईल अशा गैरवर्तणुकीबद्दल त्याविरूद्ध केलेल्या कोणत्याहि आरोपाची चौकशी होईपर्यंत, तहकूब करण्याचा अधिकार आहे आणि जर लैसेन्स धारण करणारा इसम, उक्त कलमान्वये कोणत्याहि अपराधादाखल किंवा कोणत्याहि फौजदारी अपराधादाखल दोषी ठरला तर कमिशनरने दिलेला कोणताहि लैसेन्स रद्द करण्याचा अधिकार आहे.

नियम करण्याचा अधिकार.

**८, ९ व १०.** [सन १९३२ चा मुंबई अधिनियम २०, कलम २४ (१) अन्वये रद्द करण्यात आली.]

**११, १२, १२-अ व १२-ब.** [सन १९२७ चा मुंबई अधिनियम १४, कलम ४ अन्वये रद्द करण्यात आली.]

**१३.** जो कोणी [१][यात्रेकरू नौवहन अधिनियम, १८९५, कलम ११] अन्वये मंजूर केलेल्या प्रमाणपत्रानुसार परवानगी दिलेल्या सख्येपेक्षा अधिक संख्येत कोणतीहि प्रवास तिकिटे देईल असा कोणत्याही जलयानाचा कोणताही मास्तर, मालक किंवा अभिकर्ता हा अशा रीतीने दिलेल्या प्रत्येक तिकिटादाखल, अशा तिकिटाच्या वास्तविक मूल्याच्या चारपट रकमेहून अधिक नसेल अशा दंडाच्या रकमेस पात्र होईल.

**१४.** सर्व प्रवास तिकिटे, ती ज्या क्रमानुसार देण्यात येतील त्याप्रमाणे त्यावर लागोपाठ क्रमांक दिले पाहिजेत; आणि तोच क्रमांक धारण करणारी दोन किंवा अधिक तिकिटे देईल असा काणताही मास्तर, मालक किंवा अभिकर्ता हा पराकाष्टा एक हजार रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

**१५.** [२][[१]यात्रेकरू जहाज अधिनियम, १८९५ ची कलमे ५१,५२ व ५४] चे उपबंध हे, ह्या अधिनियमाअन्वये शिक्षेस पात्र अशा सर्व गुन्ह्यास व आकारता येईल अशा सर्व दंडाच्या शिक्षेस लागू असतील.

**१६.** ह्या अधिनियमाअन्वये जलयानाचे मास्तर व मालक ज्या शिक्षेस पात्र होतील अशा शिक्षा, कमिशनच्या समोर माहिती देऊन त्याच्या सूचनेवरूनच केवळ अंमलात आणल्या पाहिजेत.

---

१. आता पहा सन १९२३ चा अधिनियम क्रमांक २१.

२. मुंबई यात्रेकरू संरक्षण (सुधारणा८ अधिनियम १९१५ (सन १९१५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५) याच्या कलम ७ द्वारे "देशी प्रवासी जहाज अधिनियम, १८७६ यामधील मजकूर व आकडे ३९, ४० व ४२" या ऐवजी हा मजकूर व आकडे दाखल करण्यात आले.

मकामुना (जे-१०६७)–१-२०१६–२,४५९ पु./२ पा.–पीए४*

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे—

* **संचालक**

  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई–४०० ००४.
  दूरध्वनी : २३ ६३ २६ ९३, २३ ६३ ०६ ९५
  २३ ६३ ११ ४८, २३ ६३ ४० ४९

* **व्यवस्थापक**

  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजिक, पुणे-४११ ००१.
  दूरध्वनी : २६ १२ ५८ ०८, २६ १२ ८९ २०, २०२ ५८ २२

* **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१.
  दूरध्वनी : २५६ २६ १५

* **सहा. संचालक**

  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद-४३१ ००१.
  दूरध्वनी : २३३ १४ ६८

* **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.
  दूरध्वनी : २६५ ०३ ९५, २६५ ०४ ०२

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**